## <u>निशाणी क्र.१३६ खाली आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादीने नि.१३० वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले. प्रतिवादी वयोवृध्द असून अनेक रोगांनी ग्रस्त आहे. तसेच घरातील कौटुंबिक, धार्मिक कार्यक्रमाकरिता दिड महिना पुणे येथे राहावे लागले. प्रतिवादी गैरहजर असल्याने दिनांक ११/११/२०२५ रोजी विना उलटतपास आदेश पारित झाला आहे. प्रतिवादी यांना उलटतपासाची संधी न दिल्यास कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना संधी दयावी. दावा गुणदोषावरवती निकाली होणेकरिता उलटतपास घेणे आवश्यक आहे. तरी अर्ज मंजूर करावा.

०२. वादीचे वकिलांनी आक्षेप नोंदवला की, अर्जातील कथन खरे नाही, वैदयकीय प्रमाणपत्र जोडले नाही. अर्ज खर्चासह नामंजूर करावा अथवा ५०००/– कॉस्ट भरून घ्यावी.

०३. युक्तीवाद ऐकला. अभिलेख व रोजनामेचे अवलोकन केले. प्रतिवादीविरूध्द विना उलटतपास आदेश पारित झाला आहे. प्रतिवादीने अर्जात नमूद केलेले कारण, त्याअनुषंगाने कोणतेही वैदयकीय प्रमाणपत्र जोडले नाही अगर पुणे येथे वास्तव्यास होते हे दाखवणारी कागदपत्रे दाखल केली नाहीत. ही बाब वादीच्या युक्तीवादाला पुष्टी देणारी आहे. असे असले तरी,कायदयाचे तत्व प्रस्थापित आहे की, तांत्रिक व प्रोसिजर कारणाने, प्रतिवादी यांच्या कायदेशीर हक्कावर सहसा गदा आणू नये. या कायदेशीर तत्वानुसार, प्रतिवादींना उलटतपास घेण्यास काही अटीसह परवानगी देणे योग्य व न्यायोचित होईल. खर्चाबाबत आदेश वादीचे हक्कात मंजूर करता येईल.सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्ज रूपये ३००/– खर्चासह मंजुर.

०२. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम रूपये ३००/– आज अगर पुढील तारखेस वादींना दयावी अगर न्यायालयात भरणा करावी. त्यानंतर पुढील तारखेस न चुकता उलटपास घ्यावा.

PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Digitally signed by PRAMOD BHAGWAN LOKHANDE
Date: 2026.03.06 11:06:41 +0530

दिनांक :- ०२.०३.२०२६

(प्र. भ. लोखंडे)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka, Steno Grade-2 |
| Court | : Civil Court Senior Division, Barshi |
| Judgment/Order signed by the P. O. On | : 02.03.2026 |
| Judgment / Order uploaded on | : 06.03.2026 |